MHRG080004742019 नि.दि.दा.क्र.४१/२०१९

श्रीमती शेवंता पाताडे वि.
श्री.केशव निकम वगैरे

## नियमित दावा क्रमांक ४१/२०१९ मधील
## निशाणी क्र.२६ खालील आदेश

वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, तिने प्रस्तुतचा दावा दिनांक २३/०१/२०१९ रोजीचे हक्कसोडपत्र रद्द करुन मिळण्याकरीता, ठरावाकरीता व कायम मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल झाल्यानंतर अनावधानाने सर्व्हे क्र.१३७/1 ही मिळकत दाव्यात सामाविष्ट करण्याचे राहून गेल्याचे तिच्या निदर्शनास आले. त्यामुळे तिने ती मिळकत दाव्यामध्ये सामाविष्ट करण्याची परवानगी मागितलेली आहे. तसेच, तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये सर्व्हे क्र.५३/३ ऐवजी ५२/३ असे नमुद झालेले आहे. ती चुकदेखील दुरुस्त करण्याची विनंती वादीने केलेली आहे. सबब, वादीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

०३. त्याउलट, प्रतिवादींनी अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांनी अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. त्यांचे असे कथन आहे की, अर्ज मोघम स्वरुपाचा असून तो फेटाळण्यास पात्र आहे. सबब, त्यांनी वादींचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०४. उभयपक्षकारांतर्फे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा वादीने दिनांक २३/०१/२०१९ रोजीचे हक्कसोडपत्र रद्द करुन मिळण्याकरीता, ठरावाकरीता व कायम मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. दावा दाखल झाल्यानंतर वादीने अनावधानाने मिळकत सर्व्हे क्र.१३७/1 दाव्यात सामाविष्ट करण्याचे राहून गेल्याचे कथन केलेले आहे. दावा सध्या प्रारंभिक स्थितीत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यातील वादप्रश्नांचा निर्णय

करण्यासाठी आवश्यक असल्याचे दिसत आहे. प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादींचेदेखील कोणतेही नुकसान होणार नाही.

०६. दाव्याची चौकशी अद्याप सुरु झालेली नाही. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ मधील परंतुकाची बाधा प्रस्तावित दुरुस्तीस लागु होत नाही. वर नमुद विवेचन केल्याप्रमाणे, प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास, वादकथनांमध्ये स्पष्टता येऊन, दावामिळकतीची वस्तुस्थिती अभिलेखावर येणार आहे. तसेच, दाव्याचा अंतिम निर्णय करण्यासाठी मदतच होणार आहे. त्याशिवाय, प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही अमुलाग्र बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादींचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे, अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:-

**:-आदेश-:**

| | |
|---|---|
| **०१)** | अर्ज (निशाणी क्र.२६) मंजुर करण्यात येतो. |
| **०२)** | वादीने अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर करावयात. |
| **०३)** | खर्चाबाबत आदेश नाही. |

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

सही/-

दिनांकः १३/१२/२०२१

खालापुर.

**(पी.एम.माने)**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर

खालापुर.